मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), मुख्य कार्यालय, तिसरा मजला,
तालुका-जिल्हा-ठाणे, 401101
निवडणुक विभाग

जा.क्र.मनपा/नि.वि./ 10 /2025-26

दिनांक:- 18/06/2025

// निवडणुक तात्काळ //

वाचा :- 1) प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील क्रमांक:एमसीओ-2025/प्र.क्र.242/नवि-14 दिनांक 10 जून 2025 रोजीचे आदेश.
2) उप सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील क्रमांक:एमसीओ-2025/प्र.क्र.242/नवि-14 दिनांक 12 जून 2025 रोजीचे आदेश.

// आदेश //

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून "ड" वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश-2025 प्राप्त झालेले आहेत. तसेच संदर्भ क्रं.02 ने प्रभाग रचना तयार करणे बाबतचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

सन 2024 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 23 दिनांक 18/03/2024 अन्वये महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकी करीता प्रत्येक प्रभागातुन शक्य असेल तेथवर चार पालिका सदस्य परंतु तिन पेक्षा कमी नाहीत व पाच पेक्षा जास्त नाहीत ऐवढे पालिका सदस्य निवडूण देण्यात येतील अशी तरतुद केली आहे.

वरील पत्रातील सुचनेनुसार प्रभाग रचना तयार करणे कामी मा. आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येत असुन समितीने संदर्भीय पत्र क्र.01 व 02 मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे प्रभाग रचना तयार करावयाची आहे.

त्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक 2025 करीता प्रभाग रचना तयार करून प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी / मा. राज्य निवडणुक आयोगाकडे सादर करणे कामी खालील अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशिल | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|---|
| 1 | स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राची संपुर्ण माहीती असलेला अधिकारी | श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव तथा सहा निवडणुक अधिकारी |
| 2 | प्रभाग रचनेशी संबंधित नेमलेला अधिकारी | डॉ. श्री. सचिन बांगर, प्र. अति. आयुक्त |
| 3 | नगर रचनाकर | श्री. पुरूषोत्तम शिंदे, नगर रचनाकार |
| 4 | संगणक तज्ञ | श्री. राजकुमार घरत, सिस्टीम मॅनेजर |
| 5 | अवश्यकतेनुसार इतर अधिकारी | श्रीम.कल्पिता पिंपळे, उपायुक्त (मु.) तथा उपनिवडणुक अधिकारी |

(राधाबिनोद ए. शर्मा)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

निवडणूक विभाग
आ.क्र. 209
दिनांक 11/06/2025

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दुरध्वनी क्र. : ०२२-२२७९ ३८३७ Email ID : sec.ud2@maharshtra.gov.in

क्रमांक : एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दिनांक : १० जून, २०२५.

**(निवडणूक प्राथम्य)**

**"ड" वर्ग महानगरपालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश-२०२५**

## आदेश

**ज्याअर्थी**, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, दिनांक ११.०३.२०२२, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५ पोट-कलम (३) मधील तरतुदीनुसार पालिका सदस्यांच्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी प्रत्येक शहर ज्या प्रभागात विभागले जाईल त्या प्रभागांची संख्या व सीमा राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी तरतूद करण्यात आली आहे.

**आणि ज्याअर्थी**, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, दि.०८.०९.२०२२ अन्वये महानगरपालिकेमध्ये निवडून द्यावयाच्या सदस्यांची किमान व कमाल संख्या निश्चित करण्यात आलेली आहे.

**आणि ज्याअर्थी**, सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, दि.१८.०३.२०२४ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर चार पालिका सदस्य, परंतु तीनपेक्षा कमी नाहीत व पाचपेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य निवडून देण्यात येतील अशी तरतूद करण्यात आली आहे.

**आणि ज्याअर्थी**, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.०६ मे, २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तात्काळ घेणे आवश्यक असून सदर निवडणुका या याचिकेतील निर्णयाच्या अधीन राहणार आहेत.

**आणि ज्याअर्थी**, महानगरपालिकांच्या निवडणूक प्रक्रीयेमध्ये (१) प्रभाग रचना करणे व आरक्षण ठरविणे, (२) विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करणे आणि (३) प्रत्यक्ष

निवडणूक घेणे अशा तीन प्रमुख टप्प्यांचा समावेश होतो व या तिन्ही टप्प्यांच्या प्रक्रियेमध्ये विविध उप-टप्पे आहेत.

**आणि ज्याअर्थी**, महानगरपालिकांच्या निवडणुकीसंदर्भातील विविध टप्पे व उप-टप्पे पूर्ण करण्याकरिता लागणारा कालावधी व मा. सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त निर्देश विचारात घेता निवडणुकांची प्रक्रिया तात्काळ सुरू करणे आवश्यक असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील उपरोक्त सुधारणांना अनुसरून निवडणुकांकरीता प्रभाग रचना करण्याबाबत आदेश देणे आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ मधील अधिकारांचा व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत "ड" वर्ग महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता सदस्य संख्या ठरवणे, प्रभाग रचना करणे इत्यादीकरीता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१. **संक्षिप्त नाव:**

या आदेशाला **" "ड" वर्ग महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश, २०२५ "** असे संबोधिले जाईल.

२. **अधिकार प्रदान:**

महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, दिनांक ११.०३.२०२२, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५ मधील तरतुदीनुसार निवडणुकीकरिता प्रभाग रचना शासनाने राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने करावयाची असून, शासन खालील "ड" वर्ग महानगरपालिकांच्या बाबतीतील हे शासनाचे अधिकार **संबंधित जिल्हाधिकारी** यांना प्रदान करीत आहे.

| "ड" वर्ग **महानगरपालिकांची नांवे** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | अमरावती महानगरपालिका | ८. | उल्हासनगर महानगरपालिका | १५. | चंद्रपूर महानगरपालिका |
| २. | अहिल्यानगर महानगरपालिका | ९. | भिवंडी-निजामपूर महानगरपालिका | १६. | परभणी महानगरपालिका |
| ३. | अकोला महानगरपालिका | १०. | जळगांव महानगरपालिका | १७. | पनवेल महानगरपालिका |
| ४. | कोल्हापूर महानगरपालिका | ११. | नांदेड-वाघाळा महानगरपालिका | १८. | इचलकरंजी महानगरपालिका |
| ५. | सोलापूर महानगरपालिका | १२. | धुळे महानगरपालिका | १९. | जालना महानगरपालिका |
| ६. | सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका | १३. | मालेगांव महानगरपालिका | | - |
| ७. | मिरा-भाईंदर महानगरपालिका | १४. | लातूर महानगरपालिका | | - |

संबंधित जिल्हाधिकारी आपले अधिकार त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांना प्रत्यार्पित करणार नाहीत.

या निवडणुकांचे कामकाज पार पाडतांना लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेणे आवश्यक आहे. ही जबाबदारी पार पाडताना निवडणुकांचे पावित्र्य राखणे आणि निवडणूक प्रक्रिया मुक्त, न्याय्य व पारदर्शक रितीने पार पडेल हे संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी पहाणे अत्यंत आवश्यक आहे.

३. **उपरोक्त महानगरपालिकेच्या प्रभाग रचना संदर्भातील विविध टप्पे व त्यासाठीचे जबाबदार असलेले संबंधित अधिकारी पुढील प्रमाणे असतील-**

| अ.क्र. | टप्पा | संबंधित अधिकारी |
|---|---|---|
| १ | प्रारुप प्रभाग रचना तयार करून जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे | आयुक्त, महानगरपालिका |
| २ | प्रारुप प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी सादर करणे | जिल्हाधिकारी |
| ३ | प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देणे | राज्य निवडणूक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी |
| ४ | प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणे | आयुक्त, महानगरपालिका |
| ५ | प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे | जिल्हाधिकारी |
| ६ | सुनावणीच्या अहवालासह अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी सादर करणे | जिल्हाधिकारी |
| ७ | सुनावणीनंतर प्राप्त अहवालानुसार अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे | राज्य निवडणूक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी |
| ८ | अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे. | आयुक्त, महानगरपालिका |

४. **विहित मुदतीत निवडणूक घेणे:**

भारतीय संविधानाने विहित केलेल्या मुदतीतच निवडणूक घेणे शक्य व्हावे म्हणून, राज्य शासनाने महानगरपालिकांची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा महिने अगोदरच्या कालावधीमध्ये तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये बदल (विभाजन, एकत्रीकरण इत्यादी) करू नये. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे दि. २७ जानेवारी, २००५ चे आदेश आहेत.

## ५. प्रभाग रचना करण्याची कार्यपद्धती:

### ५.१ जनगणनेची लोकसंख्या

जनगणना कार्यालयाने प्रसिध्द केलेली लगतच्या जनगणनेनुसार महानगरपालिका क्षेत्राची प्रगणक गटनिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची व अनुसूचित जमातीची लोकसंख्या, प्रगणक गटाचे नकाशे व घरयादी जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध करून घ्यावी. प्रभाग रचना ही फक्त **लगतच्या जनगणनेच्या लोकसंख्येच्या** आधारे केली जाते, म्हणून त्या क्षेत्रातील मतदार संख्या अथवा सध्याची रहिवाशांची संख्या विचारात घेता येत नाही व याचा प्रभाग रचनेशी कसलाही संबंध येत नाही.

### ५.२ सदस्य संख्या:

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या निश्चित करतांना क्षेत्रातील जनगणनेतील लोकसंख्येच्या आधारावर **परिशिष्ट १** नुसार महानगरपालिकेच्या एकूण सदस्य संख्येची परिगणना करण्यात यावी. यानुसार परिगणना करताना महाराष्ट्र अधिनियम क्र.४३, दि.०८.०९. २०२२ अनुसार सदस्य संख्या विचारात घ्यावी.

### ५.३ प्रभागाची संख्या:

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३, दि.१८.०३.२०२४, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ मधील तरतूदीनुसार शक्य असेल तेथवर चार सदस्य, परंतु तीनपेक्षा कमी नाहीत व पाचपेक्षा अधिक नाहीत इतके सदस्य निवडून देण्याची तरतूद विचारात घ्यावी. त्यानुसार महानगरपालिकेस प्रभाग अनुज्ञेय होतात. प्रभागांची संख्या **परिशिष्ट – १ नुसार** काढावी.

प्रभागांची संख्या ठरविताना शक्यतोवर सर्व प्रभाग चार सदस्यांचे करावयाचे आहेत. सर्वच प्रभाग चार सदस्यांचे होत नसल्यास एक प्रभाग तीन अथवा ५ सदस्यांचा होईल अथवा दोन प्रभाग ३ सदस्यांचे होतील. असे ३ अथवा ५ सदस्यांचे प्रभाग कोणत्या क्षेत्रात राहतील हे भौगोलिक सलगता राखण्याच्या दृष्टीने प्रभाग रचना करताना नागरिकांची गैरसोय टाळता येईल अशा ठिकाणी ठेवण्यात यावेत. याकरिता प्रत्यक्ष प्रभाग रचना करण्याबाबतचे इतर निकष देखील विचारात घ्यावेत. मात्र, अशी कोणतीही

परिस्थिती नराल्यास शेवटचे प्रभाग ३ किंवा ५ सदस्यांचे राहतील. महानगरपालिका क्षेत्राचे प्रभाग पाडल्यानंतर प्रत्येक प्रभागातून निवडून द्यावयाच्या सदस्य संख्येनुसार प्रभागातील जागांना प्रभागाच्या अनुक्रमांकासह यथास्थिती "अ", "ब", "क", "ड" व "इ" असे संबोधण्यात यावे. त्यानुसार उदा. प्रभाग क्रमांक-४२ मध्ये ५ जागा असल्यास त्यांना "४२अ", "४२ब", "४२क", "४२ड" व "४२इ" असे संबोधण्यात येईल.

**५.४ प्रभागांची सरासरी लोकसंख्या:-**

प्रभाग रचना करताना महानगरपालिकेची एकूण लोकसंख्या भागिले महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या गुणिले संबंधित प्रभागातून निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या या सूत्रानुसार एका प्रभागात समाविष्ट करावयाची सरासरी लोकसंख्या निश्चित करावी. प्रभागाची लोकसंख्या त्या प्रभागाच्या सरासरी लोकसंख्येच्या १० टक्के कमी किंवा १० टक्के जास्त या मर्यादेत ठेवता येईल. एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत प्रभागाची लोकसंख्या या किमान किंवा कमाल मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्याचे कारण प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करणे आवश्यक राहील.

**५.५ प्रभाग रचना करण्याची मार्गदर्शक तत्वे:**

५.५.१ प्रभाग रचना सुरु करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. उत्तरेकडून ईशान्य (उत्तर-पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभाग रचना करत सरकावे व शेवट दक्षिणेत करावा. प्रभागांना क्रमांकही त्याच पध्दतीने द्यावेत. प्रभाग रचना करताना भौगोलिक सलगता राहील, याची काळजी घ्यावी

५.५.२ प्रभागाच्या सीमारेषा, मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, डोंगर, रस्ते, रेल्वे रुळ, फ्लायओव्हर इत्यादी नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित करावी. कोणत्याही परिस्थितीत एका इमारतीचे, चाळीचे, घराचे विभाजन दोन प्रभागांमध्ये होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मोकळया जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या प्रभागात आल्याच पाहिजेत. प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका घेण्यास वाव राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. सीमेचे वर्णन करताना रस्ते, रेल्वे, नाले, नद्या, सिटी सर्व्हे नंबर यांचे उल्लेख प्रामुख्याने यावयास हवे.

५.५.३ प्रभाग रचना करताना लोकसंख्या व प्रभागाची भौगोलिकदृष्टया आटोपशीर व्याप्ती या दोन मुख्य गोष्टी असल्या तरी नागरिकांच्या सामायिक हिताकरिता खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(अ) प्रभागातील वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ब) अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्या वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(क) नागरिकांचे प्रभागामधील दळणवळण शक्यतो विचारात घ्यावे.

(ड) प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्रे, दवाखाने, स्मशानभूमी, बाजारहाटाच्या जागा, पाणी पुरवठयाच्या तसेच जलनि:सारणाच्या सोयी सुविधा, इ.चा वापर ज्या नागरिकांकडून करण्यात येतो त्या नागरिकांचा समावेश असलेल्या प्रभागातच शक्यतोवर त्या सोयी सुविधा ठेवण्यात याव्यात.

(इ) प्रभागातील मुलांकरिता सर्वसाधारणपणे उपलब्ध असणाऱ्या प्राथमिक शाळा, मैदाने, इ. शक्यतोवर त्याच प्रभागात ठेवण्यात याव्यात.

५.५.४ प्रभाग रचना करताना प्रगणक गट फोडू नये. अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्रभाग रचना करण्याकरिता प्रगणक गट फोडणे आवश्यक असेल व घरयादी उपलब्ध नसेल, तर त्या प्रकरणी सोबतच्या **परिशिष्ट – ५** मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्वेक्षण करून संबंधित क्षेत्रात लगतच्या जनगणनेच्या वेळी लोकसंख्या कशाप्रकारे वितरित झाली होती, हे निश्चित करावे. सर्वेक्षण करताना जनगणना ज्यावेळी झाली त्यावेळी म्हणजे २०११ मध्ये लोकसंख्येचे वितरण कसे होते, हे जाणून घ्यावयाचे असल्याने सर्वेक्षण करताना २०११ मध्ये जनगणनेच्यावेळी संबंधित व्यक्ती दिलेल्या पत्त्यावर राहत होती किंवा कसे, संबंधित इमारत कधी बांधण्यात आली इत्यादी बाबी लक्षात घ्याव्यात.

५.५.५ प्रत्येक प्रभागाच्या सीमारेषेचे वर्णन करताना उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम अशा दिशा नमूद करून सीमारेषेचे वर्णन करावे. सीमारेषा नमूद करताना शहरातील सर्वसाधारण नागरिकाना प्रभागाची पूर्ण कल्पना येईल याची काळजी घ्यावी.

५.५.६ प्रभाग रचनेमध्ये प्रभागांना अनुक्रमांक देण्यात येतात. प्रभागाचे क्षेत्र तात्काळ लक्षात यावे याकरिता प्रभागांना अनुक्रमांकासोबत प्रभागाचे नाव देता येईल किंवा कसे? हेही तपासावे. प्रभागांना नाव देणे हे बंधनकारक नाही. तथापि, महानगरपालिका आयुक्त प्रभागांना नाव देण्याबाबत निर्णय घेऊ शकतात. प्रभागांना नाव द्यावयाचे झाल्यास ते अशाप्रकारे देण्यात यावे जेणेकरुन सदर प्रभाग कोणत्या क्षेत्रातील आहे हे तात्काळ लक्षात येईल. उदा. त्या प्रभागातील प्रसिध्द असलेले महत्वाचे ठिकाण अथवा त्या प्रभागातील सर्वाधिक लोकसंख्या असलेले एखादे नगर अथवा वस्ती, इ.

**५.६ प्रभागाची लोकसंख्या आणि मर्यादेचे पालन:**

प्रभाग रचना करताना प्रभागातील सरासरी लोकसंख्या, जागांचे गुणोत्तर आणि १० टक्के कमाल/ किमान मर्यादेचे पालन करावे. अपवादात्मक परिस्थितीत भौगोलिक परिस्थितीमुळे अगर प्रगणक गट न फोडल्यामुळे प्रभागाची लोकसंख्या अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी अगर जास्त होत असल्यास, त्याची कारणे प्रभाग रचनेच्या प्रस्तावात नमूद करणे आवश्यक आहे. अशा प्रभागांच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाची अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांची मान्यता असणे आवश्यक आहे.

**५.७ गुगल मॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे:**

५.७.१ महानगरपालिकेच्या प्रभाग रचनेची मांडणी गुगल अर्थच्या नकाशावर खालीलप्रमाणे करणे अनिवार्य आहे:-

(i) गुगल अर्थचा नकाशा, या नकाशावर प्रगणक गटांच्या सीमा हिरव्या रंगाने दर्शवाव्यात. प्रगणक गटांचे क्रमांक व त्या प्रगणक गटांची लोकसंख्या दर्शवावी. प्रत्येक प्रगणक गटाच्या बहुभूजास त्या प्रगणक गटाचा क्रमांक, एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या लेजेंडमध्ये भरावी.

(ii) जनगणना प्रभागांच्या सीमा निळया रंगाने दर्शवाव्यात.

(iii) नकाशावर शहरातील महत्वाची ठिकाणे, रस्ते, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे दर्शवावे.

(iv) नवीन निवडणूक प्रभागांच्या हद्दी लाल रंगाने दर्शविण्यात याव्यात.

(v) नकाशांचा आकार, नकाशावर दर्शविलेले प्रगणक गटांचे क्रमांक, लोकसंख्या, इत्यादी तपशील वाचता येईल या प्रमाणात असावा. नकाशे

सुलभपणे हाताळता यावेत याकरिता आवश्यक असल्यास दोन किंवा तीन भागात नकाशे तयार करावेत.

(vi) प्रत्येक प्रभागाचा स्वतंत्र नकाशा तयार करावा, त्याच्या हद्दी स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात. त्या हद्दींवर असणारे रस्तो, नद्या, नाले, रेल्वे लाईन इत्यादी स्पष्टपणे नकाशावर नमूद करावेत.

(vii) प्रत्येक प्रभागामध्ये समाविष्ट झालेले प्रगणक गट व नकाशानुसार त्या प्रभागामध्ये समाविष्ट होणारे प्रगणक गट एकच आहेत, याची खात्री करावी. तसेच जनगणनेकडून प्राप्त झालेली लोकसंख्येची आकडेवारी योग्यरित्या दर्शविण्यात आलेली आहे, याचीही खात्री करावी.

५.७.२ शासन आदेश, आयोगाचे निकष, अधिनियमातील व नियमातील तरतुदी, मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयाने दिलेले निदेश विचारात घेऊन प्रारुप प्रभाग रचना तयार करावी.

५.७.३ मागील अनेक निवडणुकांमध्ये निदर्शनास आल्यानुसार अयोग्य प्रकारे प्रभाग रचना केली गेल्यामुळे अनेक रिट याचिका मा. उच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. काही याचिकांमध्ये अशा चुकीच्या प्रभाग रचनेबाबत न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. यामुळे तयार केलेला प्रभाग रचनेचा आराखडा योग्य प्रकारे तयार करण्यात आला असून नियम व निकषांचे पालन झाले आहे याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची असेल.

५.७.४ वरील परिच्छेदानुसार कार्यवाही करून प्रभाग रचना आराखडा जतन करण्यात येईल व प्रारुप प्रसिध्दीच्या दिनांकापर्यंत त्याची गोपनीयता राखण्यात येईल. यासाठी परिछेद ६.१ मध्ये नमुद केल्यानुसार नियुक्त करण्यात आलेल्या समिती व्यतिरिक्त इतर कोणालाही आराखड्याची माहिती दिली जाणार नाही.

५.७.५ अशा तयार केलेल्या नकाशाची केएमएल (KML) / केएमझेड (KMZ) फाईल तयार करावी. संपूर्ण हद्दीची तसेच प्रभागनिहाय इमेज फाईल देखील तयार करावी. **गुगल अर्थच्या नकाशावर प्रभाग रचना मांडणी करण्याची कार्यपध्दती परिशिष्ट – ७** मध्ये देण्यात आली आहे. या कार्यपध्दतीचा अवलंब करून केएमएल (kml) / केएमझेड (kmz) फाईल तयार करावी.

५.७.६ प्रत्येक प्रभागामध्ये समाविष्ट झालेले प्रगणक गट व नकाशानुसार त्या प्रभागामध्ये समाविष्ट होणारे प्रगणक गट एकच आहेत, याची खात्री करावी. तसेच जनगणना कार्यालयाकडून प्राप्त झालेली लोकसंख्येची आकडेवारी योग्यरित्या दर्शविण्यात आली आहे, याची खात्री करावी.

**५.८ त्यानंतर प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव महानगरपालिका आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे तयार करावा.**

i. परिशिष्ट १ - सदस्य संख्या व प्रभागांची संख्या याची परिगणना.
ii. परिशिष्ट २ व २ अ - हद्दींची व्याप्ती व वर्णनाबाबत.
iii. परिशिष्ट ३ - निवडणूक प्रभागांमध्ये समाविष्ट प्रगणक गट व लोकसंख्या
iv. परिशिष्ट ४ - प्रगणक गटनिहाय माहिती. (Excel Soft File)
v. परिशिष्ट ५ - प्रगणक गटाचे विभाजन करताना द्यावयाचे प्रमाणपत्र.
vi. परिशिष्ट ६ - महानगरपालिका आयुक्तांनी प्रारुप प्रभाग रचनेबाबत द्यावयाचे प्रमाणपत्र.

## ६. प्रारूप प्रभाग रचना :

### ६.१ प्रभाग रचनेची प्राथमिक तपासणी:

सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचना तयार करण्याकरिता आयुक्त, महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली नमूद अधिकाऱ्यांची समिती तयार करण्यात यावी.

i. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राची संपूर्ण माहिती असलेला अधिकारी.
ii. प्रभाग रचनेशी संबंधित नेमलेला अधिकारी.
iii. नगर रचनाकार.
iv. संगणक तज्ञ.
v. आवश्यकतेनुसार इतर अधिकारी.

### ६.२ प्रारूप तयार करणे:

प्रभाग रचनेशी संबंधित अधिकाऱ्यांनी तयार केलेला प्रारुप आराखडा संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्यासमोर ठेवण्यात येईल. महानगरपालिका आयुक्त हा आराखडा अधिनियमातील तरतूदी, नियमातील तरतूदी राज्य शासन व राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशातील तरतूदींचे पालन करून तयार केला आहे हे तपासतील. त्याचप्रमाणे प्रभागांची संख्या व रचना हे नियमानुसार तयार झाले आहे हे देखील तपासतील. महानगरपालिका आयुक्त प्रारूप प्रभाग रचनेचे गुगल अर्थ नकाशे परिच्छेद

५.७ नुसार योग्य रितीने तयार केले आहेत किंवा करो हे तपासून घेतील, अन्यथा योग्य नकाशे तयार करून घेण्याची कार्यवाही करतील. प्रभाग रचना पूर्वतयारीची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिका आयुक्त यांची राहील.

**६.३ प्रारूप प्रभाग रचनेस मान्यता:**

(i) प्रारूप प्रभाग रचनेची महानगरपालिका आयुक्तांनी तपासणी केल्यानंतर प्रभाग रचनेच्या योग्यते बाबत त्यांचे समाधान झाल्यानंतर ते त्याबाबत **परिशिष्ट- ६** मधील नमुन्यात प्रमाणपत्र देतील. या प्रमाणपत्रासह प्रारुप प्रभाग रचनेचा **प्रस्ताव जिल्हाधिकारी** यांना सादर करावा.

**(ii)** महानगरपालिका आयुक्तांनी सादर केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेची आवश्यक ती तपासणी करून ती तरतूदीनुसार करण्यात आली आहे याची खात्री झाल्यास, जिल्हाधिकारी प्रारुप मान्यतेसाठी राज्य निवडणूक आयोग अथवा राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे सादर करतील व त्यांची मान्यता मिळाल्यानंतर ते प्रारुप प्रसिध्दीसाठी महानगरपालिका आयुक्तांकडे पाठवतील.

**७. प्रारूप प्रभाग रचनेची व्यापक प्रसिद्धी:**

७.१ प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना महानगरपालिका आयुक्त यांनी राज्य शासनाने नेमून दिलेल्या दिनांकास शासन राजपत्रात प्रसिध्द करावी. ( **प्रारुप अधिसूचनेचा नमुना परिशिष्ट – ८ (मराठी) व परिशिष्ट – ९ (इंग्रजी)** मध्ये देण्यात आलेला आहे.)

७.२ त्याच दिनांकास सोबतच्या **परिशिष्ट – १० (मराठी) व परिशिष्ट – ११ (इंग्रजी) मधील नमुन्यात वर्तमानपत्रात जाहिरात** द्यावी.

७.३ राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मान्य करुन दिलेला सर्व प्रभागांचा एकत्रित नकाशा (नकाशा – अ) तसेच प्रत्येक प्रभागाचे नकाशे (नकाशा – ब) आणि अधिसुचना महानगरपालिकेच्या कार्यालयातील दर्शनी भाग / हॉल येथे सर्व जनतेस सुलभतेने पाहता येईल अशा पध्दतीने प्रसिध्द करावेत.

७.४ राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मान्य करुन दिलेला नकाशा – अ व नकाशा – ब चे पीडीएफ संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.

७.५ प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या नकाशांवर व विहित नमुन्यांवर संबंधीत महानगरपालिका आयुक्त, उपायुक्त (निवडणूक) व नगररचनाकार यथास्थिती सहायक संचालक नगररचना यांच्या स्वाक्षऱ्या असणे अनिवार्य आहे.

७.६ सदर प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेवर, हरकती व सूचना कोणत्या कालावधी मध्ये, कोणत्या ठिकाणी दाखल करता येतील, याबाबत योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

## ८. हरकती व सूचना:

८.१ नागरिकांना प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीची माहिती देण्यात येईल.

८.२ हरकती व सूचना सादर करण्याच्या कालावधीत नागरिकांकडून हरकती व सूचना स्विकारण्याची व्यवस्था महानगरपालिका कार्यालयात करण्यात येईल.

८.३ हरकत किंवा सूचना दाखल केल्याची संबंधीतांना पोचपावती देण्यात यावी, ज्यामध्ये त्यांनी हरकत सादर करतानाचा दिनांक व वेळ नमूद केला जाईल.

८.४ आलेल्या हरकती व सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे.

८.५ प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांचा गोषवारा **परिशिष्ट १२** नुसार तयार करण्यात येईल आणि सदर गोषवारा जिल्हाधिकारी व राज्य निवडणूक आयोगास अथवा राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास सादर करण्यात येईल.

८.६ प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना व त्यावर हरकती व सूचना स्विकारण्याचा कालावधी व त्या कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांचा तपशील यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, महानगरपालिका व प्रभाग कार्यालयांचे सूचना फलक, संकेतस्थळ, इत्यादी)

८.७ प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची योग्यरितीने दखल घेण्यात येईल, याची उपाययोजना महानगरपालिका आयुक्तांनी करावी. (उदा. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांची नोंदवही ठेवणे, हरकती कोणामार्फत स्विकारण्यात येतील यांची निश्चिती, प्रत्येक हरकती व सूचनांना क्रमांक देणे, हरकतीचे स्वरुप नमूद करणे, इत्यादी)

९. **प्रारुप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी देणे:**

i. प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर निश्चित केलेल्या स्थळी व निश्चित केलेल्या दिनांकास / कालावधीमध्ये जिल्हाधिकारी यांनी सुनावणी द्यावी.

ii. सदर सुनावणी महानगरपालिका क्षेत्रात घेण्यात येईल व सदर सुनावणीस संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

iii. या सुनावणीकरिता सर्व व्यवस्था (उदा. हरकतदारांना सुनावणीची लेखी नोटीस देणे, उपस्थितांची स्वाक्षरी घेणे, सुनावणीचे विवरणपत्र ठेवणे, सुनावणीच्या ठिकाणी व्हिडिओ चित्रीकरणाची व्यवस्था करणे, इत्यादी) महानगरपालिका आयुक्त यांनी करावी.

iv. सुनावणीच्यावेळी केलेली प्रारुप प्रभाग रचना सर्वांना दिसेल अशाप्रकारे मोठ्या स्क्रीनवर दर्शविण्यात यावी. प्रभागांच्या हद्दीबाबत असलेल्या हरकतींसंदर्भात गुगल अर्थच्या नकाशावर सध्याचे प्रारुप प्रभाग व हरकतदाराने प्रभागांच्या हद्दीमध्ये मागणी केलेले बदल मोठ्या स्क्रीनवर दाखविण्यात यावेत.

v. हरकती व सूचनांना सुनावणी देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याने प्रत्येक तक्रार व सूचनांची दखल घेऊन नियमाप्रमाणे योग्य ते अभिप्राय देणे आवश्यक आहे. अंतिम प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे त्यांनी घेतलेला निर्णय अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्याची आवश्यकता नाही.

१०. **अंतिम प्रभाग रचना:**

i. जिल्हाधिकारी यांनी सुनावणी घेतल्यानंतर **परिशिष्ट-१३ मधील** हरकती व सूचनांवर दिलेल्या सुनावणीवरील शिफारशींसह तयार केलेला अंतिम प्रभाग रचनेचा प्रस्ताव, महानगरपालिका आयुक्त यांच्या मार्फत राज्य निवडणुक आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या मान्यतेसाठी निश्चित केलेल्या दिनांकापर्यंत सादर करावा.

ii. राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडून वरीलप्रमाणे अंतिम मान्यता आल्यानंतर त्यानुसार प्रभाग रचनेच्या प्रस्तावात (सर्व विवरणपत्रे, नकाशे व अधिसूचना) योग्य ते बदल महानगरपालिका आयुक्त यांनी

करावेत. त्यानंतर अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना शासनाने नेमून दिलेल्या दिनांकास राजपत्रात प्रसिध्द करावी. ( **अंतिम अधिसूचनेचा नमुना परिशिष्ट-१४ (मराठी) व परिशिष्ट-१५ (इंग्रजी)** मध्ये देण्यात आलेला आहे.)

iii. या अंतिम अधिसूचनेला व्यापक प्रसिध्दी द्यावी. (उदा. वृत्तपत्रे, महानगरपालिका व प्रभाग कार्यालयांचे सूचना फलक / संकेतस्थळ राज्य निवडणूक आयोगाची संकेतस्थळ, इत्यादी) अंतिम प्रभाग रचनेच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेच्या **दोन प्रती** राज्य शासनास/ राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात याव्यात.

iv. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०१२/प्र.क्र.२३/का-५, दिनांक- १७ जुलै, २०१२ नुसार प्रभाग रचनेच्या ( प्रारुप व अंतिम) प्रसिध्द करण्यात येणाऱ्या नकाशांवर महानगरपालिका आयुक्त तसेच संबंधित नगर रचनाकार (यथास्थिती सहायक संचालक, नगर रचनाकार) यांच्या स्वाक्षऱ्या असणे आवश्यक आहे. तसेच सर्व परिशिष्टांवर महानगरपालिका आयुक्तांची स्वाक्षरी आवश्यक राहील.

v. यानंतर अंतिम प्रभाग रचनेवर कोणतीही हरकत अगर सुनावणी नियमानुसार अभिप्रेत नाही.

## ११. गोपनीयता:

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभाग रचनेचे कामकाज गोपनीयरित्या हाताळण्यात यावे. प्रभाग रचनेची माहिती ही सर्वसामान्य नागरिकांना प्रारुप प्रसिध्दीच्यावेळी पहिल्यांदा कळते. तत्पूर्वी राजकीय व्यक्ती, प्रसिध्दी माध्यमे अथवा अन्य व्यक्तींना याबाबतची माहिती देता येणार नाही तसेच प्रभाग रचनेच्या कामाशी संबंधित अधिकारी अगर कर्मचारी यांच्यावर त्यासाठी कोणालाही दबाव टाकता येणार नाही. कोणत्याही अधिकाऱ्याने / कर्मचाऱ्याने प्रभाग रचनेची गोपनियता भंग केल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

१२. **सर्वसाधारण:**

i. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५ मधील तरतुदीन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार प्रभाग रचनेसंदर्भातील अधिकार राज्य शासनास, राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने वापरावयाचे आहेत. त्यामुळे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी अथवा महानगरपालिका आयुक्त यांना स्वतःहून प्रभाग रचनेच्या कार्यक्रमात कोणताही बदल अगर स्थगिती देता येत नाही.

ii. यापुढे "ड" वर्ग महानगरपालिकांच्या होणा-या सर्व निवडणुकांमध्ये केवळ " **"ड" वर्ग महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश, २०२५ "** या आदेशामध्ये केलेल्या तरतुदी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०६१०१९५०१३१६२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

GOVINDARAJ KORAMANNA HIRANYA GOWDA

Digitally signed by GOVINDARAJ KORAMANNA HIRANYA GOWDA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=1ca32fa5e4e3aa5a832798cc4e6b1a14f3190519557695f4e6918 7ed22d67f03, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4B6A32EE2BCD3729DE72D06B8D13086546DD5AD93BDAC010E0842FDCCD8715E6, cn=GOVINDARAJ KORAMANNA HIRANYA GOWDA
Date: 2025.06.10 19:51:31 +05'30'

**( डॉ.के.एच.गोविंदराज )**
**प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन**

**सहपत्र :-**

सोबतच्या अनुक्रमणिकेत दर्शविल्यानुसार परिशिष्ट १ ते १५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता**

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. सर्व जिल्हाधिकारी.
३. सर्व महानगरपालिका आयुक्त ("ड" वर्ग).

**प्रत माहितीकरीता**

१. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
२. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग,(नवि-१).मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील शासनाचे वकील.
४. निवड नस्ती.

निवडणूक विभाग
आ.क्र.:- २०४
दिनांक: १२/०६/२०२५


महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
४ था मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्र. : ०२२-२२७९ ३८३७ Email ID : priyanka.chhapwale@nic.in


क्रमांक : एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/नवि-१४ दिनांक : १२ जून, २०२५.

**प्रति,**

सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायतींचे मुख्याधिकारी

**विषय:- राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकाबाबत.**

**संदर्भ:-** समक्रमांकाचे दि.१०.०६.२०२५ रोजीचे आदेश.

**महोदय,**

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूका प्रस्तावित असून, सदर निवडणूकांच्या अनुषंगाने प्रभाग रचनेसंदर्भातील सूचना दि.१०.०६.२०२५ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. प्रभाग रचनेसंदर्भातील कालबध्द कार्यक्रम सोबत जोडण्यात येत असून, या कालबध्द कार्यक्रमामध्ये नमुद करण्यात आलेल्या कालावधीनुसार टप्पेनिहाय कार्यवाही पुर्ण होईल याची दक्षता संबंधित अधिकारी यांनी घेण्यात यावी.

३. तसेच, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका विहीत कालावधीत घेण्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असल्याने, या कालबध्द कार्यक्रमामध्ये कोणत्याही प्रकारची सुट अथवा सवलत अनुज्ञेय असणार नाही.

आपली,

pchhapwale

(प्रियांका कुलकर्णी-छापवाले)
शासनाच्या उप सचिव

प्रत :-

१) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
२) निवडनस्ती (नवि-१४)

## "ड" वर्ग दर्जाच्या महानगरपालिकांच्या प्रभाग रचनेकरीता वेळापत्रक

| अ. क्र. | प्रभाग रचनेचा टप्पा | | कार्यवाही करणारा अधिकारी | दिनांक (पासून-पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| १. | प्रगणक गटाची मांडणी करणे. | | संबंधित महानगरपालिका आयुक्त | ११ जून, २०२५ ते १६ जून, २०२५ |
| २. | प्रारुप प्रभाग रचना तयार करणे | | संबंधित महानगरपालिका आयुक्त | |
| | अ. | जनगणनेनची प्राप्त माहिती तपासणे. | | १७ ते १८ जून, २०२५ |
| | ब. | स्थळ पाहणी. | | १९ ते २३ जून, २०२५ |
| | क. | गुगलमॅपवर प्रभागाचे नकाशे तयार करणे. | | २४ ते २६ जून, २०२५ |
| | ड. | नकाशावर निश्चित केलेल्या प्रभागहद्दी जागेवर जावून तपासणे. | | २७ जून ते ३० जून, २०२५ |
| | ई. | प्रारुप प्रभाग रचनेच्या मसुद्यावर समितीने स्वाक्षऱ्या करणे. | | ०१ ते ०३ जुलै, २०२५ |
| ३. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगास पाठविणे | | जिल्हाधिकारी संबंधित महानगरपालिका आयुक्तांमार्फत | ०४ जुलै, २०२५ ते ०८ जुलै २०२५ |
| ४. | मा.राज्य निवडणूक आयोग/ आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देणे. | | | |
| ५. | प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे व त्यावर हरकती सूचना मागविणे | | संबंधित महानगरपालिका आयुक्त | १५ जुलै, २०२५ ते २१ जुलै, २०२५ |
| ६. | जिल्हाधिकारी/ जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याने प्राप्त हरकती सूचनांवर सुनावणी घेणे. | | जिल्हाधिकारी | २२ जुलै, २०२५ ते ३१ जुलै, २०२५ |
| ७. | सुनावणीनंतर हरकती व सूचनांवरील शिफ़ारशी विचारात घेऊन प्राधिकृत अधिका-यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना मा.राज्य निवडणूक आयोगास मान्यतेस पाठविणे. | | जिल्हाधिकारी संबंधित महानगरपालिका आयुक्तांमार्फत | ०१ ऑगस्ट, २०२५ ते ०७ ऑगस्ट, २०२५ |
| ८. | मा.राज्य निवडणूक आयुक्त यांनी मान्यता दिलेली प्रभाग रचना सबंधित महापालिका आयुक्त/ मुख्याधिकारी यांना कळविणे. | | | |
| ९. | मा.राज्य निवडणुक आयुक्त यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करणे. | | संबंधित महानगरपालिका आयुक्त | २२ ऑगस्ट, २०२५ ते ०१ सप्टेंबर, २०२५ |